# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 18/05/2023 (गुरूवार) दुपार


### रेती चोरी करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पो.स्टे. अरोली** :– अंतर्गत १० किमी अंतरावर मौजा खरडा शिवार येथे दिनांक १७/०५/२०२३ चे ०६/०० वा. ते ०६/४५ वा. दरम्यान पोलीस स्टेशन अरोली येथील स्टाफ यांना गोपनिय बातमीदारांकडुन माहिती मिळाली की, एक इसम मौजा खरडा शिवार येथे सुर नदीचे पात्रातून अवैधरीत्या विनापरवाना रेतीची वाहतुक करीत आहे अशा मिळालेल्या माहिती वरून अरोली पोलीस पथक नमुद घटनास्थळी गेले असता आरोपी नामे– संजय भगवानजी भोयर, वय ३६ वर्ष, रा. श्रिखंडा हा सुर नदीचे पात्रातील विनापरवाना अवैधरीत्या ०१ ब्रास रेती किंमती अंदाजे ३०००/–रू चोरून नेतांनी मिळुन आल्याने आरोपीच्या ताब्यातुन निळया रंगाचा ट्रॅक्टर क्र. एम. एच.– ४०/सी. ए. –९३४८ किंमती अंदाजे ४,००,०००/–रू. व निळया रंगाची विना नंबरची ट्रॉली किंमती अंदाजे १,००,०००/– रू. ज्यामध्ये ०१ ब्रास रेती. कि. ३०००रू असा एकुण वाहनासह ५,०३,०००/– रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पोहवा/११६२ पुडके पोस्टे अरोली यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास स.फौ/१३३१ जाधव मो. नं: ८८३०९६५३४७ हे करीत आहे.

### चोरी

**पो.स्टे. केळवद** :– अंतर्गत १० कि.मी. अंतरावरील मौजा तेलंगखेडी शिवार येथे दिनांक १५/०५/२०२३ चे १७/०० वा. ते १७/०५/२०२३ चे ०९/३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सुनिल प्रभुजी परीपगारे, वय ३० वर्ष, रा. वार्ड क्र. ०३, ब्राम्हणी ता. कळमेश्वर याने तेलंगखेडी शिवारातील शेतात ४०–४० चे टँक तयार करुन त्यात सन २०२२ मध्ये ७०००/– रु. चे मत्स्य बीज टाकले होते दि. १७/०५/२०२३ रोजी सकाळी ०९/३० वा. दरम्यान फिर्यादी नेहमी प्रमाणे शेतात गेले असता फिर्यादीला त्याच्या मत्स्य पालनाच्या टँक जवळ मासे पकडण्याचे जाळे अस्ताव्यस्त पडलेले दिसले तेव्हा फिर्यादीने पाण्यात दगड मारुन पाहीले असता कुठल्याच प्रकारचे मास्यांची हालचाल होताना दिसली नाही फिर्यादीच्या मते त्याच्या तलावात अर्धा किलो प्रमाणे अंदाजे ७०,०००/– रु. चे मासे तसेच बांधकामासाठी ठेवण्यात आलेले ८ एम. एम. चे १० फुट लांबीचे २० बार किमंती अंदाजे ५०००/– रुपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. केळवद येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ. पवार ब नं ७७१ मो नं ७८७५९८३३६० हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर